## बातमी पत्र [२]

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर**

**माहिती कक्ष दिनांक ७ मे २०१२.**

---

## सोलापूर शहरात घरगुती गॅसचा काळाबाजार करणारा कुप्रसिध्द गुन्हेगार **रजाक गफुर शेख** यास स्थानबध्द .

सोलापूर शहरातील फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीत घरगुती वापराच्या गॅसचा मोठया प्रमाणावर काळाबाजार करणारा कुप्रसिध्द गुन्हेगार नामे- **रजाक गफुर शेख, रा. घर-नं-५, थोबडे वस्ती,सोलापूर** याचेवर फौजदार चावडी व सलगरवस्ती पोलीस ठाणे येथे जीवनावश्यक वस्तु अधिनियमअंतर्गत तसेच मारामारी करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे गेल्या ३ वर्षापासुन दाखल आहेत. घरगुती वापराच्या गॅसचा मोठया प्रमाणावर काळाबाजार करून त्याने फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीत गॅस टंचाई सदृश परिस्थीती निर्माण केली होती. त्याची व त्याच्या साथीदारांची थोबडेवस्ती परीसरात व विशेषत: रिक्षा चालकांमध्ये एक प्रकारची दहशत पसरली होती. या दहशतीच्या जोरावर त्याने जीवनावश्यक वस्तुच्या काळया बाजाराचा अवैध व्यवसाय गेल्या अनेक वर्षापासुन सुरु ठेवला होता. त्याच्या व त्याच्या साथीदारांच्या दहशतीमुळे त्याच्या अवैध व्यवसायाबद्दल माहीती देण्यास कोणीही पुढे येत नव्हते. दाखल गुन्हयात त्यास वेळोवेळी अटक करुन व प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्याचे वर्तनात सुधारणा न करता त्याने त्याचे काळयाबाजाराची बेकायदेशीर कृत्ये चालुच ठेवले होते. काळया बाजारासारख्या कृत्यात तो नेहमीच गुंतलेला असल्यामुळे प्रचलित कायदयाद्वारे त्याचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई त्याची अवैध कृत्ये थांबविण्यास अपुरी ठरत होती. त्यामुळे अशाप्रकारे त्याचे वाढत चाललेल्या गुन्हेगारी कृत्याचा विचार करून त्यास प्रतिबंध करून आळा घालणेसाठी मा. हिम्मतराव देशभ्रतार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी त्यास दि. ७/५/२०१२ रोजी जीवनावश्यक वस्तुच्या काळया बाजारास प्रतिबंध अधिनियम, १९८० चे कलम ३ अन्वये स्थानबध्द करणे बाबत आदेश निर्गमित केले. त्याप्रमाणे त्यास दि. ७/५/२०१२ रोजी ताब्यात घेवून स्थानबध्द केले असून त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे रवाना करणेत आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) श्री. राजेंद्र माने, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) श्री. पी.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहा. पोलीस आयुक्त श्री. विजय जोशी व वपोनि श्री. नितीन कौसडीकर, तसेच गुन्हे शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक- सुहास नाईक, पोना/शांताराम वाघमारे, पोना/मोहन गवळी, पोकॉ/मिलिंद मिठापल्ली व पोकॉ/सचिन रामदास गायकवाड यांनी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त श्री. हिम्मतराव देशभ्रतार यांनी सर्व पोलीस स्टेशनला गुंड,समाजविघातक,अवैध व्यवसाय करणारे, शासकीय निळे रॅाकेल व घरगुती वापराच्या गॅसचा काळा बाजार करणारे गुन्हेगारांची यादी तयार करण्याच्या सुचना यापूर्वीच दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे तशी यादी तयार करणेत आली असून त्या यादीप्रमाणे आतापर्यंत एकूण- १६ गुन्हेगारांना येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द करणेत आले आहे. सदरची कारवाई यापूढेही अशीच चालू राहणार आहे.

**(सोबत फोटो पाठविलेला आहे.)**

---

पोलीस आयुक्त,
सोलापूर शहर.